
वयोवृद्धः मनोयुवा

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई


संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१.
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.




# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३० अंक-१० ऑक्टोबर २०२२






राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांना कोटी कोटी प्रणाम..!





दि. १ ऑक्टोबर - ज्येष्ठ नागरिक दिनाच्या व दीपावलीच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा..!

# आधारस्तंभ



## डॉ. भास्कर रामराव पाटील

पत्ता : विठ्ठलनगर, एस.टी. डेपोच्या मागे, मु.पो./जि. लातूर - ४१३ ५१२..

जन्मतारीख : २९/०७/१९४९ **मोबाईल नं.** : ९८२२४४९२५२

सेवा : सार्वजनिक आरोग्य सेवेतून ३४ वर्षे सेवाकरून निवृत्त.

कार्य : अध्यक्ष, फेस्कॉम प्रादेशिक विभाग, दक्षिण मराठवाडा; रोटरी, हास्यक्लब मध्ये पदाधिकारी; श्री. सयाजी शिंदे यांच्या सह्याद्री देवराई व लातूर वृक्ष चळवळीत सक्रीय.




## ॲड. नजीर अल्लीसाहेब इनामदार

पत्ता : कमानवेस, घोरपडे वाड्याजवळ, मु.पो./ता. मिरज ४१६ ४१०, जि. सांगली.

जन्मतारीख : ०१/०६/१९५२ **मोबाईल नं.** : ९८२३२६४०३०

सेवा : पूर्ण क्षमतेने वकीली (४६ वर्षे पूर्ण), मुस्लिम कायद्याचे विशेष ज्ञान, शेतीचे व्यक्तिशः कामकाज.

छंद : अध्यात्माची आवड, सर्व धर्मीय आदर, बहुजन समाजाचे मित्र मिळविणे.



## श्री. दिलीप वैजीनाथ पवार


पत्ता : फ्लॅट नं. ९, मोती पार्क, मोहनवाडी, येरवडा, पुणे ४११ ००६.

जन्मतारीख : ०१/०६/१९४८ **मोबाईल नं.** : ९८५०१६०६१३

शिक्षण : M.A., M.Ed.

सेवा : आईस्कॉनमध्ये सेंट्रल कौन्सिल सदस्य; अध्यक्ष-विश्रांतवाडी ज्येष्ठ नागरिक मंडळ; अध्यक्ष-विश्रांतवाडी हास्य क्लब; कार्यकारी अध्यक्ष-ॲस्कॉप पुणे; सदस्य-शांतता कमेटी, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन; संचालक-जनसेवा फाऊंडेशन.

छंद : वाचन, लेखन, ज्येष्ठांना मदत, सामजिक कार्य.



## श्री. सुधीर शामराव नाईक

पत्ता : आदर्श शिक्षण मंदिर समोर, किल्ला भाग, मिरज ४१६ ४१०. जि. सांगली.

जन्मतारीख : **मोबाईल नं.** : ९८२२४१३४६८

सेवा : युनियन बँकेतून निवृत्त, माजी अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक संघ; मिरज भूषण पुरस्कार प्राप्त तसेच मिरजेतील अनेक सामाजिक, धार्मिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग व पदाधिकारी.

# फेस्कॉम प्रशिक्षण शिबीर - भाग १

श्री.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)चे वतीने २ व ३ ऑगस्ट २०२२ रोजी प्रादेशिक विभागांचे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांचे प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. या प्रशिक्षण शिबीरामध्ये खालील पदाधिकारी यांनी त्यांना दिलेल्या विषयावर मार्गदर्शन केले.

## दि.०२/०८/२०२२

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अरूण रोडे<br>फेस्कॉम अध्यक्ष | - | फेस्कॉमची प्रशासकीय कार्यप्रणाली व समान लेखापद्धती |
| २) श्री.टी.पी.आर.उन्नी<br>महासचिव आईस्कॉन | - | आई, वडिल व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ नविन अमेंडमेंट व सिनिअर सिटीझन्स मुव्हमेंट इन इंडिया |
| ३) श्री. ना.ना. इंगळे<br>अध्यक्ष ज्ये.ना.भवन समिती | - | ज्येष्ठ नागरिकांसाठीचे केंद्र व राज्य शासनाचे धोरण |
| ४) श्री.आण्णासाहेब टेकाळे<br>फेस्कॉम उपाध्यक्ष | - | महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक लाभाच्या योजना |
| ५) घटनेचे प्रगट वाचन | - | प्रत्येक पदाधिकारी यांनी सुधारीत घटनेतील २ पानांचे वाचन केले. |

## दि.०३/०८/२०२२

| | | |
|---|---|---|
| १) श्री अंजुमन खान<br>फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख | - | कृतिशील वृद्धत्व व मनोहारी मनोयुवाचा त्यातील सहभाग |
| २) श्री.विवेक देशपांडे<br>मुख्य सचिव<br>श्री.चंद्रकांत महामुनी<br>अध्यक्ष प्रा.वि.पुणे | - | फेस्कॉम डिजीटल ॲकेडमीच्या माध्यमातुन डिजीटल साक्षरता |
| ३) श्री.रमेश पारखे<br>श्री.अरूण रोडे<br>फेस्कॉम अध्यक्ष | - | आई-वडिल व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ व नियम २०१० |
| ४) गटवार चर्चा व सादरीकरण<br>(यातील विषय) | - | १) गाव तेथे संघ<br>२) समन्वय समितीची भूमिका व गरज<br>३) सभासद आणि पदाधिकारी यांना सक्रिय करण्यासाठी विशेष उपाय. |

**या प्रशिक्षण शिबीरातील विविध वक्त्यांनी मांडलेल्या विचार सारांश पद्धतीने खालील प्रमाणे –**

महासंघाअंतर्गत १२ प्रादेशिक विभाग आहेत. या सर्व प्रादेशिक विभागात कार्यपद्धतीत एकवाक्यता नाही. काही ठिकाणी रेकॉर्ड व्यवस्थित ठेवलेले नाही. संघ सभासदांचे रजिस्टर अद्ययावत ठेवले नाही. त्याच बरोबर आर्थिक रजिस्टरे देखील अद्ययावत ठेवली नाहीत. आर्थिक व्यवहाराबाबत मासिक अगर त्रैमासिक तेरीज काढले जात नाही. फेस्कॉमला पाठविले जात नाही. याचाच परिणाम फेस्कॉमला सर्व प्रादेशिक विभागसह त्रैमासिक तेरीज काढता येत नाही. वार्षिक आर्थिक पत्रके मुदतीत फेस्कॉमला मिळू शकत नाहीत. त्यामुळे फेस्कॉमला तपासनीसाकडून वार्षिक आर्थिक पत्रके मिळणेस विलंब होत आहे. यासाठी सर्व प्रादेशिक विभागांनी फेस्कॉमने दिलेल्या नमुन्यातच संघ सभासद रजिस्टर आणि आर्थिक किर्दी ठेवाव्यात अशा सुचना देणेत आलेल्या आहेत. याचबरोबर प्रादेशिक विभागाच्या होणाऱ्या त्रैमासिक सभेचे इतिवृत्त ज्या त्या वेळी फेस्कॉमला सादर करणेची घटनेनुसार बंधनकारक आहे. परंतु फेस्कॉमला बरेच प्रादेशिक विभाग सभेचे इतिवृत्त पाठवित नाहीत. त्यामुळे प्रादेशिक विभागस्तरावर कार्य कसे केले जाते याबाबतची माहिती मिळू शकत नाही. प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी वेळोवेळी इतिवृत्त फेस्कॉमला सादर करणेबाबत देखील मार्गदर्शनपर आवाहन करणेत आले.

केंद्र/ राज्य शासनाचे केंद्रिय धोरणाबाबत मार्गदर्शन करणेत आले. यामध्ये प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी धोरणाचा पूर्णपणे अभ्यास करणे अपेक्षित आहे. धोरणा अंतर्गत शासनाच्या कोणत्याही विभागावर ज्येष्ठांसाठी कोणती जबाबदारी सोपविलेली आहे याचा विभागावर अभ्यास असणे आवश्यक आहे. जिल्हा स्तरावरील संनियंत्रण समन्वय समितीचे सभेस सर्वच विभाग प्रमुख यांना निमंत्रित करणेत येते का ? ते उपस्थित राहतात का ? हे आपल्या सदस्यांनी पाहणे आवश्यक असून मा. जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे. या सभेत पदाधिकारी यांनी आपली मते अभ्यासपूर्वक मांडणे आवश्यक आहेत. प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष अथवा जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष यांचा प्रत्येक विभागाशी सतत संपर्क आवश्यक आहे. सततच्या संपर्कासाठी धोरणाचा संपूर्ण अभ्यास अतिशय महत्वाचा आहे.

शासनाने नागरिकांसाठी विविध आर्थिक लाभाच्या योजना जाहीर केल्या आहेत. प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघाने आप-आपल्या गावातील आर्थिक दुर्बल घटकांना, दिव्यांगाना, विधवांना आर्थिक लाभ मिळावा असा प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष/जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष प्रथम स्वतः अभ्यासपूर्व तयार होवून आर्थिक लाभाच्या योजना ग्रामीण भागापर्यंत/संघापर्यंत पोहचविणेचा प्रयत्न करावा. या योजनाद्वारा पात्र व्यक्तिंना आर्थिक लाभ मिळवून देणेची जबाबदारी ज्येष्ठ नागरिक संघाची व पर्यायाने तालुका/जिल्हा समन्वय समित्यांची आहे याची जाणीव प्रत्येक पदाधिकाऱ्यास असणे आवश्यक आहे.

आईवडिल आणि ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ नियम २०१० या कायद्यांचा संपूर्ण अभ्यास प्रत्येक पदाधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांना होणारा विविध प्रकारचा त्रास कमी करणेसाठी या कायद्याअंतर्गत कसा फायदा मिळू शकेल याचा प्रचार व प्रसार होणे ही आता काळाची गरज बनली आहे. समुपदेशासाठी प्रत्येक महाविद्यालये/हायस्कूल, एन.एस.एस. कँप या माध्यमातून प्रत्येक गावी विविध कार्यक्रम होणे आवश्यक आहेत. विद्यापिठांच्या सहकार्याद्वारे विविध स्तरावर कार्यक्रम घेणे शक्य होणार आहे. यासाठी विधी व न्याय विभागाचे देखील सहकार्य मिळत आहे.

फेस्कॉम डिजिटल ॲकॅडमीद्वारा डिजिटल साक्षरतामध्ये आधुनिक तंत्रज्ञान मिळत आहे. याचा फायदा सर्व प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी उचलला पाहिजे. यामध्ये अडचणी उद्‌भवल्यास

संबंधित अध्यक्ष / पदाधिकारी यांचे मार्गदर्शन घेवून त्यामध्ये सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे.

फेस्कॉमचे कार्य आणि फेस्कॉम ज्येष्ठ नागरिक यांचेसाठी करित असलेल्या कार्याबाबतची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचली पाहिजे, ज्येष्ठ नागरिक धोरण, आर्थिक लाभाच्या योजना, याची माहिती ग्रामीण भागापर्यंत पोहचविणेचे कार्य फेस्कॉमचे मुखपत्र ''मनोहारी मनोयुवा'' या मासिकाद्वारा संपन्न होत आहे. आरोग्य, ताणतणाव याबाबतच्या विविध लेखकांच्या लेखाद्वारा ज्येष्ठांचे आरोग्य /मानसिक स्वास्थ्य टिकविणेचे व सुधारणेचे कार्य या मासिकाद्वारा साध्य होत असलेने प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघाने, पदाधिकारी यांनी मासिकाचे वर्गणीदार होणे आवश्यक आहे. याचबरोबर ग्रामपंचायती, वाचनालये, समाजसुधारक, डॉक्टर्स, वकील वगैरे संस्थांना / प्रतिष्ठीतांना या मासिकाचे वर्गणीदार बनवून ग्रामीण भागातील ज्येष्ठांचे उर्वरीत आयुष्य सुखसमाधानाने व्यतीत होणेसाठी सदरचे मासिक हे एक प्रमुख शास्त्र आहे.

या विविध मार्गदर्शनाबरोबरच दोन दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराचे फलनिष्पत्तीसाठी गटवार चर्चासत्राचे आयोजन केले. पदाधिकाऱ्यांचे तीन गट तयार करुन त्यांच्यावर वेगवेगळे विषय सोपविणेत आले. दोन दिवसांचे प्रशिक्षण आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणेसाठी आणि प्रामुख्याने ''फेस्कॉमने ज्येष्ठ नागरिकासाठी काय केले? आणि काय करते?'' याचे ज्येष्ठांना प्रबोधन करणेसाठी चर्चा करावी आणि ज्येष्ठांना आशावादी बनविणेसाठी कोणते मुद्दे उपयोगी पडतील याबाबत चर्चा करुन अहवाल सादर करणेचे आवाहन केले. तीनही गटांनी व्यक्त केलेली मते खाली दिली आहेत. यामध्ये वर्गणीदार यांना देखील फेस्कॉम संधी देत आहे. वर्गणीदार यांनी देखील आपले विचार व्यक्त करावेत ही विनंती.

या तीनही गटातील पदाधिकारी यांनी सखोल चर्चा करुन काही मुद्दे /विषय सुचविलेले आहेत हे मुद्दे अगर विषय केवळ फेस्कॉम संघटनेपुरते संकुचित न राहता मासिकाचे सर्वच वर्गणीदार यांचेपर्यंत पोहचवून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेणेची फेस्कॉमची इच्छा आहे.

राज्यातील प्रत्येक ज्येष्ठ नागरिक हा फेस्कॉम कुटुंबातील आहे. तो आरोग्यदायी, आनंदी तणावयुक्त आणि आर्थिकदृष्ट्या समृध्द रहावा असे फेस्कॉमच्या कार्यप्रणालीतील महत्वाचा घटक आहे. प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांच्या उन्नतीसाठी फेस्कॉम कटिबध्द आहे. राज्यातील प्रत्येक ज्येष्ठ वैभवशाली रहावा यासाठीचे उपायाबाबत आपण मतप्रदर्शित केलेस फेस्कॉम त्या उपायाचा साकल्याने विचार करेल.

**विषय– समन्वय समितीची भूमिका व गरज**

गट नं. २ ने सुचविलेले मुद्दे, –

१) गाव पातळीवरील ज्येष्ठ नागरिक संघ व फेस्कॉम प्रादेशिक विभाग यांचेमध्ये संपर्क व समन्वय ठेवण्यासाठी समन्वय समिती अत्यावश्यक आहे.

२) फेस्कॉमचे कामकाज गतिमान करण्यासाठी समन्वय समितीची आवश्यकता आहे.

३) ज्येष्ठ नागरिक संघाचे उत्तम संघटन व संपर्क यासाठी शहर/तालुका/जिल्हा पातळीवर समन्वय समितीच्या नियुक्त्या आवश्यक.

४) प्रत्येक तहसिल कार्यालय स्तरावर समन्वय समितीची आवश्यकता.

५) समन्वय समितीमुळे फेस्कॉमचे अंगीकृत उद्दिष्ट ज्येष्ठ नागरिक संघ पातळीवर पोहोचविणे शक्य.

६) फेस्कॉमच्या धोरणानुसार महिला संघ देखील गठीत करणेस प्राधान्य.

७) संघ स्तरावर असलेल्या अडचणी सोडविणे व मार्गदर्शन करणे शक्य.

८) निष्क्रिय संघ सक्रिय करणे व कोणताही संघ पटावरुन कमी होणार नाही याची दक्षता घेणे शक्य.

९) अति दुर्गम भागातही नवीन संघ स्थापन करणे शक्य.

१०) कार्यरत असलेल्या पण संलग्न नसलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांना फेस्कॉमशी संलग्न करुन घेणे शक्य.

११) कार्यक्षेत्रातील संघांच्या वार्षिक वर्गणी जमा

करणेस चालना मिळू शकेल.

१२) फेस्कॉम व शासन स्तरावरील शासन निर्णय व समाजाभिमुख कार्यक्रम, उपक्रम संघ पातळीवर पोहोचविणे व त्याची कार्यवाही करुन घेणे शक्य.

१३) प्रगत तंत्रज्ञान अवगत असलेल्या व्यक्तीला सहयोगी, हितचिंतक व आश्रयदाते सभासद करुन घेणे शक्य.

१४) फेस्कॉमचे मुखपत्र ''मनोहरी मनोयुवा''चा प्रचार व प्रसार करुन वर्गणीदार वाढीस चालना मिळणे शक्य.

१५) आर्थिक लाभाच्या योजनांची माहिती निराधार, वंचित, गरीब, मागास यांचेपर्यंत पोहोचविणेसाठी संघपातळीवर मार्गदर्शन करणे शक्य.

**गटचर्चेत सहभागी सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) अंजुमन खान | – | सांगली |
| २) चंद्रकांत महामुनी | – | पुणे |
| ३) हनुमंत कुंभार गुरुजी | – | पुणे |
| ४) नामदेवराव डफळ | – | पुणे |
| ५) डॉ. बी. आर. पाटील | – | लातूर |
| ६) प्रभाकर कापसे | – | लातूर |
| ७) यशवंतराव चव्हाण | – | सांगली |
| ८) आर. ए. देसाई | – | सांगली |
| ९) टी.एन. शिणगारे | – | सांगली |
| १०) विनायक पांडे | – | अकोले |

डॉ. श्री. बी. आर. पाटील यांनी अहवाल सादर केला.

**सभासद आणि पदाधिकारी यांना सक्रिय करण्यासाठी विशेष उपाय –**

१) फेस्कॉमचे कार्य अधिकाधिक प्रभावी करण्यासाठी फेस्कॉमचे सभासदांनी पदाधिकाऱ्यांना अधिक क्रियाशील करणे.

२) कोरोनाच्या काळात फेस्कॉमच्या सर्वच संलग्नित ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या कार्यात फारच शिथिलता आली. वार्षिक वर्गणी, नवीन सभासद नोंदणी, संस्थेचे विविध कार्यक्रमाचे आयोजन, सभासदांशी भेटी-गाठी, सामाजिक उपक्रमाचे आयोजन इ. सर्वच बाबींवर परिणाम झाल्याने सर्वच सभासदांचे संघाचे सदस्य आणि पदाधिकारी ह्यांना अधिक सक्रिय करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

३) फेस्कॉमचे सभासदांना अधिक कार्यशील बनवण्यासाठी त्यांना फेस्कॉमचे प्रमुख उद्दिष्ट्ये, घटना, नियमावली ह्याबद्दल संपूर्ण माहिती दिली गेली. त्याच्यासाठी मध्यवर्ती संघटनेतर्फे सुरुवातीस ट्रेनिंग आयोति करण्यात यावे.

४) प्रादेशिक अध्यक्षांनी सभासदांशी सतत संपर्कात राहून आवश्यक ते मार्गदर्शन दिले पाहिजे.

५) संस्थेतील ज्येष्ठांच्या अडचणी, समस्या नीट समजावून घेऊन त्यावर कोणते उपाय करता येतील याबद्दल पदाधिकाऱ्यांना नीट मार्गदर्शन दिले गेले पाहिजे.

६) पदाधिकाऱ्याने सभासदांशी सतत संपर्कात राहणे आवश्यक आहे. तरच सभासदाच्या समस्या समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे शक्य होईल.

७) वर्षातून किमान एकदा तरी सामान्य सभासदांच्या अडीअडचणी समजावून घेणेसाठी प्रादेशिक अध्यक्षांनी त्यांची सभा आयोजित करावी.

८) पदाधिकारी कोणत्याही राजकीय पक्षाचा अधिकृत पदाधिकारी असेल आणि प्रसार, प्रचार करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्यापासून सावध असावे. अशा सदस्यांना फेस्कॉमचे पदाधिकारी म्हणून निवडणुकीत सहभागी होता येऊ नये ह्यासाठी गरज लागल्यास घटनेत बदल करावे लागतील ते करावे.

९) समाजात घडणाऱ्या घटना, ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास, गैरसोयी ह्याबद्दल सदस्यांना सतत माहिती देत राहून त्यांना सक्रिय करीत राहावे.

१०) सदस्यांच्या अडचणी, पदाधिकाऱ्याचे कार्य, अडचणी ह्याबद्दल अध्यक्षांनी त्याच्याशी संपर्कात राहून मार्गदर्शन करीत रहावे.

११) आगामी काळात एखादा पदाधिकारी निवृत्त होणार असेल तर त्याच्या जागेवर सक्षम उमेदवार तयार करण्याची जबाबदारी ही Directly/indirectly इतर पदाधिकाऱ्यांवर येते.

१२) सदस्य सभासद झाल्यावर त्याला अध्यक्ष, इतर पदाधिकारी ह्यांना विशेष भेटून फेस्कॉमच्या सर्व चळवळींमध्ये किमान महत्वाची माहिती द्यावी. त्याबाबत उपलब्ध असलेले साहित्यपत्रक तयार करुन त्याची नवीन सभासद/पदाधिकारी ह्यांना द्यावी.

१३) सभासद झाल्यावर वैयक्तिक फायद्यापेक्षा ज्येष्ठ नागरिकांच्या एकूण मदतीचे कार्य करण्यासाठी फेस्कॉमच्या मुळ उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे, अशी स्पष्ट जाणीव त्यांना द्यावी.

१४) किमान दोन-तीन वर्षांतून एकदा फेस्कॉम प्रादेशिक विभाग तसेच मध्यवर्ती संघटना ह्यांनी अधिवेशनाचे आयोजन करावे आणि त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक चळवळीच्या बाबत, ज्येष्ठ नागरिकांसाठी केलेले विविध कायदे, त्यातील बदल, आंतरराष्ट्रीय कायदे, सुधारणाबाबत माहिती देणारे वक्ते, विविध स्पर्धांचे आयोजन या मार्गे ज्येष्ठ नागरिकांमध्ये नवचैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे.

१५) विविध विषयावर तज्ञांमार्फत भाषणे आयोजित करावीत.

१६) ज्येष्ठांच्या विषयावर पुस्तके, शॉर्टफिल्म तयार करुन प्रसारीत करावीत.

१७) शक्य झाल्यास गावातील गरीब झोपडपट्टीत त्याच्यासाठी जर कार्यालय असेल तेथे भेट देवून सरकारी योजनांबद्दल त्यांना माहिती देण्याचा प्रयत्न करावा.

१८) मध्यवर्ती कार्यालयातून प्रत्येक विभागात डॉ. भट व्याख्यानमालेतर्फे व्याख्यानाचे आयोजन करावे.

**गटात उपस्थित सदस्य**

१) श्री. नानासाहेब इंगळे
२) श्री. विजय औंधे
३) श्री. शरद डिचोलकर
४) श्री. परब
५) श्री. काळे
६) श्री. बी. एन. पाटील

**गाव तेथे संघ**

''गाव तेथे संघ'' त्यावर झालेल्या चर्चेचे सार व निष्कर्ष. .

१) फेस्कॉमच्या सभासद प्रतिनिधींनी, ज्येष्ठ नागरिक चळवळीत, स्वतःला झोकून दिले पाहिजे हा सर्वात महत्वाचा मुद्दा, त्यात काम करतांना आवड व महत्वाचे म्हणजे सवड ही काढलीच पाहिजे तरच आपण आपल्या भूमिकेला न्याय देऊ शकतो या विषयी सर्वांचे एकमत होते.

२) या कार्यास सुरुवात कशी करावी, वेगवेगळ्या मत-मतांतरानंतर, ज्या ग्रुपने जायचे ठरवले असेल, त्यात सहभाग घेणाऱ्या प्रत्येकानेच ज्येष्ठ नागरिक चळवळीचा इतिहास स्वतः वाचन करून, त्यावर आपसात साधक-बाधक चर्चा केली पाहिजे, त्यावर आपणास काय प्रश्न विचारले जातील, त्यावर समाधानकारक उत्तर कसे द्यायचे हा पूर्णतः अभ्यास करूनच जावे यावर सर्वांचे एकमत झाले.

३) शहराऐवजी खेड्यातील ज्येष्ठ नागरिक, या चळवळीशी अपरिचित आहे, पण खेड्यातच आपल्या चळवळीची गरज आहे, व आपले उद्दीष्टही ''गांव तेथे संघ'' हे नजरेसमोर ठेऊन शुभारंभ करतांना, ज्या गावात जायचे त्या गावाची माहिती आधी संकलीत करावी, तेथील लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामसेवक, राजकारणात रस असणाऱ्या पुरुष-महिला यांची माहिती घेणे, त्यांच्याशी संवाद साधणे, शक्यतोवर प्रत्यक्ष भेट घेऊन जास्तीत जास्त सहकार्य करण्याची,

त्यांच्या कडून अपेक्षा आहे हे त्यांना पटवून देणे, येण्याची तारिख, वेळ व ठिकाण या विषयावर माहिती घ्यावी, शक्यतो आसपास खेड्या-पाड्यांतील लोक जमावेत म्हणुन त्या गावाचा आठवडे बाजाराचा दिवस ठरवावा.

४) आपल्याला तेथे जाण्याअगोदर, ज्या गावात जायचे असेल त्या गावात, एक आठवड्या-आधीच्या बाजारात अगोदर छापील पत्रके तयार करून वितरित करावित, आसपासच्या गावात, खेड्यात तेथील प्रथेप्रमाणे त्यांच्या मार्फतची दवंडी देऊन, जास्तीत जास्त नागरिक जमवण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

५) प्रत्यक्ष जाण्याचे आदल्या दिवशीच संपर्क करून सुचना देणे, जातांना ''मनोहारी मनोयुवा'' या आपल्या मुखपत्राच्या १०/१२ प्रती व जेवणाच्या सोयीनुसार डबे, बसण्यास सतरंजी बरोबर घेऊन जावे ..छोट्या पाड्यावर जायची वेळ आली तर हे आवश्यक आहे.

६) तेथे पोहोचल्यावर जमलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिक व महिला यांचे परिचय पश्चात, ज्येष्ठ नागरिक चळवळीचा उद्देश, गरज सर्व प्रकारच्या फायद्याविषयी सर्वांना अवगत करावे, शंकाकुशंका, अडीअडचणी, विविध प्रकारचे प्रश्न विचारण्यासाठी त्यांना उद्युक्त करावे व सरळसोप्या भाषेत त्यांच्या शंका, प्रश्नांचे निरसन करावे.

निरनिराळ्या गावातून जमलेल्या सर्व नागरिकांची गांववार नाव व फोन नंबर, वय या विषयी आपल्या वहीत नोंद करून घ्यावी.

७) वेगवेगळ्या गटात त्यांची विभागणी करून प्रत्येक गावात मनोहारी मनोयुवाचा १ अंक त्या गावच्या लोकांना द्यावा.

८) जमलेल्या नागरिकांना आपआपल्या पद्धतीने आपला प्रमुख प्रतिनिधी निवडण्यास उद्युक्त करावे, परंतु त्यांस मराठी लिखाण, वाचन व इंग्रजी भाषेचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे, हे सुद्धा सुचित करावे, निवडलेल्या प्रमुख प्रतिनिधीस त्याच्या कलाने हजर असलेल्या त्यांच्या गावातील सहकाऱ्यांची निवड करण्यास सांगावे.

इतके झाल्यावर तात्पुरती पदाधिकारी, कार्यकारिणीची निवड त्यांनाच करू द्यावी, सर्व नोंदणी करुन, संपर्काकरिता एकमेकांचे फोन नंबर घेऊन, आपआपल्या गावात त्यांनी ही माहिती गावकऱ्यांना सांगण्याचे सूचीत करावे, संघ उद्घाटनाच्या दिवशी परत येण्याचे ठरवून निरोप घ्यावा..

ठरल्या दिवशी उद्घाटनाच्या कार्यक्रमास ज्यांना आमंत्रित केले असेल त्यांनी अवश्य जावे, त्यांनी सुचविलेल्यांना संघाचे पदाधिकारी नेमणूक करुन कार्य पद्धती समजून सांगाव्या, किमान २५ वर सभासद नोंदणी करण्याचे आवाहन करावे..

९) महासंघाची घटनेची पुस्तके बरोबरच न्यावी, त्यांनी निवडलेल्या संघ पदाधिकारी व कार्यकारिणी यांना फेस्कॉमच्या घटनेतील मार्गदर्शनानुसार संघाचे काम चालवावे हे ही समजवावे, वेळोवेळी अडचण वाटली तर बिनधास्तपणे फोन करून विचारा, म्हणून सांगावे, संघाचे अस्तित्वाविषयी मधून मधून फोन करून चौकशी करीत जावी..

ग्रुपमधील सामील सदस्य ..

१) श्री. विवेक देशपांडे
२) श्री. सुरेश पवार
३) श्री. प्रकाश पिंपरकर
४) श्री. जयवंत सोमवाड
५) श्री. नारायण वाढणकर
६) श्री. चंद्रकांत नलावडे
७) श्री. सुभाष कटके
८) श्री. सुहास काटे
९) श्री. रामदास वाघमारे

* * *

## ''ज्येष्ठ नागरिक संघ धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणी''

नविन ज्येष्ठ नागरिक संघ यांनी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाकडे (फेस्कॉम)कडे संलग्नतेसाठी संबंधी फेस्कॉम प्रादेशिक विभागाद्वारा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात १२ प्रादेशिक विभागे कार्यरत आहेत. फेस्कॉमच्या त्रैमासिक सभेत मंजुरी मिळुन संलग्नता प्रमाणपत्र मिळाले नंतर ज्येष्ठ नागरिक संघास आपले कार्य सुरू करता येते.

फेस्कॉमच्या घटनेनुसार प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघ धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संघ धर्मदाय कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेस संघास संघासाठी/आपल्या सभासदांसाठी विविध देणगीकाराकडून/संस्थांकडुन चेकद्वारेदेखील देणग्या मिळविता येतात. राष्ट्रीयकृत बँकेकडे खाते उघडता येते. याच बरोबर शासकीय सुविधांचा लाभ उदा. विरंगुळा केंद्रासाठी जागा, बांधकामासाठी मदत (आमदार/ खासदार/ मा.जिल्हाधिकारी यांचेकडील अनुदान) मिळविता येते.

संघाचे कार्य पारदर्शक पद्धतीने सुरु ठेवणेसाठी संघ धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणीकृत करुन घेणे आवश्यक आहे. दरवर्षी ऑडीटर कडून कागदपत्रांची तपासणी करून अहवाल धर्मादाय कार्यालयास ऑनलाईन पाठवावा लागतो. यामुळे पारदर्शकता निर्माण होते. प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघाने आपला संघ धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणीकृत करून घ्यावा. संघ नोंदणीकृत करून घेतलेस त्रास होतो ही भ्रामक कल्पना निर्माण झाली आहे. या कार्यालयाशी ऑन लाईन संपर्क साधता येत असलेने आणि कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी ज्येष्ठांना सहकार्याची भावना ठेवत असलेने कोणताही त्रास होत नाही. आज स्थितीत बरेच संघ नोंदणीकृत असलेने ऑडीट अहवाल ऑन लाईन पाठवतात. बदल अहवाल (होईल तेव्हा) देखील ऑनलाईन पाठवित असलेने कोणताही त्रास होत नसलेचे अनुभवावरून दिसुन येते.

''मनोहारी मनोयुवा'' अंक सुरु झालेनंतर बऱ्याच संघांनी, धर्मादाय कार्यालयाशी संघ नोंदणीकृत करणेबाबतची माहिती, अंकाद्वारा सर्व संघांपर्यंत पोहचवावी अशी विनंती करणेत आली. याकामी धर्मादाय कार्यालयाशी संपर्क साधला. त्यांनी फार चांगले सहकार्य केले. त्यांनी याबाबतचे सर्व फॉर्मचे नमुन्यांचा संच तर दिलाच शिवाय सदरचे नमुने https://charity.maharashtra.gov.in/Portals/0/files/societies%Registrar या संकेतस्थळावर उपलब्ध असलेबाबतही मार्गदर्शन केले.

संस्था नोंदणीसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन या दोन्ही प्रकारचा उपयोग करता येतो. सध्या ऑनलाईन अर्ज करण्याकडे नागरिकांचा जास्त कल आहे. संस्था नोंदणीबाबतची माहिती आणि नमुने सर्वांच्या माहितीसाठी दिले आहेत. या माहितीचा/नमुन्यातील फॉर्मांचा/अर्जाचा उपयोग करुन प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघाने आपला संघ धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणी करून घ्यावा आणि शासकीय मदत/संस्थांकडील मदत मिळविणेचा प्रयत्न करावा असे आवाहन करणेत येत आहे. याकामी अधिक माहितीसाठी जिल्हास्तरावरील धर्मादाय कार्यालयाशी संपर्क साधावा.

**ज्येष्ठ नागरिक संघ/संस्था धर्मादाय कार्यालयात संस्था नोंदणीकरिता सादर करावयाची कागदपत्रे**

१) ज्ञापन/विधानपत्र/मेमोरेंडम ऑफ असोसिएशन

२) नियम व नियमावलीची सत्य प्रत

३) संस्था नोंदणीबाबत कार्यकारी मंडलाच्या सर्व सभासदांचे संमती पत्र

४) सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकारपत्र

५) संस्थेच्या पत्याबाबत व मालमत्तेबाबतचे अध्यक्ष किंवा सेक्रेटरी यांचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- व कोर्ट फी स्टॅम्प रु.५/- सह

६) अनुसूची एक नियम ७, अनुसूची दोन नियम ८, अनुसूची सहा नियम १५

७) संमत्तीपत्र व हमीपत्र

८) संस्था स्थापनेची ठराविक प्रत

९) प्रथम कार्यकारिणीची यादी

१०) संस्थेच्या जागेबाबत जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र

११) सर्व सभासदांचे ओळखपत्र व पत्याचा पुरावा.

**महत्त्वाच्या बाबी**

* जी संस्था सुरु करावयाची आहे तिचे नाव इतर संस्थेच्या नावाप्रमाणे नसावे.

* संस्थेच्या जर व्यक्तीचे किंवा घराण्याचे नाव द्यावयाचे असल्यास त्यांच्या कुटुंबाचे अथवा वारसांचे संस्थेला नाव न देण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र व नाव देण्यास संमत्तीपत्र घेणे आवश्यक आहे.

* ज्येष्ठ नागरिक संघाच्या/ संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळीतील ज्येष्ठ यांचे वय ६०+ असावे.

* व्यवस्थापक/सदस्यांची संख्या विषम असावी उदा. ७, ९, ११

* संस्था स्थापनेनंतर संस्थेच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत खाते सुरु करावे.

* जास्तीत जास्त व्यवहार चेकने करावेत.

* दरवर्षी संस्थेचे ऑडीट करुन घ्यावे.

* शासकीय योजना/ नविन शाळा/प्रकल्प यात संस्थेला योगदान देण्यासाठी किंवा कामे घेण्यासाठी संस्थेचे किमान ३ ऑडीट्स लागतात.

* * *

# फुल टाईम आजोबा



आजोबांच्या चहाबरोबरच दूध पिणार,
त्यांच्या चहात बिस्कीट बुडवणार
आंघोळ घालायला आजोबाचं हवेत,
हास्य आणि पाण्याची कारंजी उडवणार
स्कूलचा ड्रेस आजोबानींच मला घालायचा,
बेल्ट बांधताना गुदगुल्या करणार.
पेरेंटस मिटींगला आजोबाच येऊ देत,
आईबाबा खुशाल ऑफीसला जाऊ देत
होमवर्कच्या मदतीला धावून येतात आजोबा,
खाडाखोड झाली की मारतात बाबा
क्रिकेट खेळायला हवेत आजोबा,
बॅटींग फक्त मलाच मिळते बाबा
गोष्ट मला आजोबाच सांगू देत खूप
त्यांनाच घाबरत असतं भूत
झोपताना आजोबांना मऊ उशी,
मला त्यांच्या कुशीत खुशी
आजोबा खूप मोठ्ठे आहेत
सर्व बाबतीत ट्रेंड आहेत.
पण माझे मात्र फ्रेंड आहेत
माझे मात्र फ्रेंड आहेत.

- डॉ.व्यंकटेश जंबगी
मो.नं.९९७५६००८८७

# आधारस्तंभ



विलेपार्ले येथील पंडित मनोहर जोशी यांचा विवेक देशपांडे व श्या.गो.पाटील यांचे हस्ते शंभरीतील प्रवेशाच्या वाढदिवसानिमित्त सत्कार प्रसंगी.




डोंबिवलीतील टिळकनगर ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मुख्य सचिव विवेक देशपांडे. सोबत पप्रादेशिक विभागाचे अध्यक्ष श्या. गो. पाटील



पालघर येथे पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील यांच्या उपस्थितीतील बैठक प्रसंगी



फेस्कॉम आयोजित पदाधिकारी यांचे प्रशिक्षण प्रसंगी फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे, भवन समितीचे अध्यक्ष ना. ना. इंगळे व इतर पदाधिकारी




मालगांव येथील हुतात्मा स्मारकातील भेटीप्रसंगी सत्कार स्वीकारताना मा.पी.के.माने व इतर ज्येष्ठ.



माऊली ज्येष्ठ नागरिक संघ कसबे-डिग्रज यांचे वतीने वयोवृध्द महिलेचा सत्कार



रिंगणगांव (जळगांव) येथील नवीन ज्येष्ठ नागरिक संघाचे स्थापनाप्रसंगी मार्गदर्शन करताना फेस्कॉमचे माजी अध्यक्ष डी. टी. चौधरी




स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा. उध्दव भोसले यांचा मनोहारी मनोयुवाचा अंक देताना अशोक तेरकर व जयवंत सोमवाड

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023



बहिणाबाई चौधरी उ.म.विद्यापीठ जळगाव व पाळधी येथील श्रीराम ज्येष्ठ नागरिक मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य व कायदेविषयक कार्यशाळेचे उद्घाटन करताना फेस्कॉमचे माजी अध्यक्ष डी.टी. चौधरी



मालगांव (ता. मिरज) येथील हुतात्मा स्मारकातील हुतात्मा व स्वातंत्र्यसैनिक यांचे चित्रमय प्रदर्शन पाहताना स्वातंत्र्यसैनिक समितीचे अध्यक्ष मा. माधवराव माने



ठाणे येथील ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समितीस वारकरी भवनच्या पहिल्या मजल्याचा ताबा खासदार मा.श्री. राजन विचारे यांच्या उपस्थितीत मिळाला. त्याप्रसंगीचा फोटो.



हुतात्मा स्मारक (मालगांव) येथील स्वातंत्र्य सैनिकांचे चित्रमय प्रदर्शनास भेट देणारे नागरिक



पाटस (जि. पुणे) येथील नागनाथ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. पांडुरंग लाड यांच्या 'नेत्र मित्र' म्हणून सत्कार प्रसंगी.



मालगांव येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त मशाल मिरवणूक प्रसंगी पांडुरंग केसरे, गंगाधर तोडकर, तलाठी श्री. खरात व इतर मान्यवर



अजिंक्य ज्येष्ठ नागरिक संघ, विकासपूर (सातारा) च्या वर्धापन दिन अंकाचे प्रकाशन करताना श्री. अरुण गोडबोले व इतर मान्यवर

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,

______________________

______________________

______________________